प्रेमा तुझा रंग कसा ?' या नाटकातील विनोदी प्रसंग तुमच्या शब्दात लिहा. 10

6. 'उत्कट प्रेमभावनेचा आविष्कार कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितांमधून होतो.' या विधानाची सत्यता पटवा.

**किंवा**

कुसुमाग्रजांच्या कवितेच्या आधारे त्यांचा मानवतावादी दृष्टिकोन स्पष्ट करा. 20

7. खालीलपैकी कोणत्याही **एका** कवितेचे रसग्रहण करा :-

(अ) स्वप्नाची समाप्ती

(ब) क्रांतीचा जयजयकार

(क) लिलाव. 10





**B.A. (Part–I) Examination**
**MARATHI (Literature)**
**(Optional Subject)**

वेळ : तीन तास ] [एकूण गुण : 100

1. खालील वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा :- 20

(अ) "लेकाराची आन खाऊन सांगतो बाप्पूजी. माहया देखता याईनं त्याच्या मढ्यावर नोट घातली. तुमी संगान त आमी गाईचं शेपूट धरतो-नाई त त्याले धर मना"-

**किंवा**

"पन, एवढं करून तुले थ्या हातामभऱ्या पोट्टीले संगं घेऊन कामावर जाले कोनं सांगितलं होतं ?"

(आ) "उगाच काही तरी बोलू नका. आमची सूनबाई मार्यदा सोडून कध्धी वागायची नाही. या पोरालाच माणसे वागवून घेण्याची काही अक्कल नाही!"

**किंवा**

"स्वत:वरच्या गाढ प्रेमाच्या मायावी स्वप्नातून जागी हो आणि आलीस तशी परत जा."

(इ) "श्रीमंत महाली तिथे हिला ना थारा

मखमाली दुलया देती मधुर उबारा

डोकावुन पळते कापत हीच थरारा

हो काय दरारा कनकाचा भयशाली

हिमलाट पहाटे पहा जगावर आली!"

**किंवा**

"म्हणे, राहिन दिन एक मी उपाशी

परी लाभूदे दोन घास यासी

खिसा ओतूनि त्या भुक्या ओंजळीत

चालु लागे तो दीनबंधु वाट."

(ई) "चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती

कथा या खुळ्या सागराला

"अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा

किनारा तुला पामराला !"

**किंवा**



"परी भव्य ते तेज पाहून पुजून

घेऊ गळ्याशी कसे काजवे

नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा

तुझी दुरता त्याहुनी साहवे."

2. 'धग' या कादंबरीतील ग्रामीण जीवनाचे चित्रण स्पष्ट करा.

**किंवा**

कौतिकचे व्यक्तिचित्र रेखाटा. 15

3. नामाचा शिक्षणासाठी चाललेला संघर्ष 'धग' या कादंबरीच्या आधारे व्यक्त करा.

**किंवा**

भीमाचे स्वभावचित्रण करा. 10

4. प्रो. बल्लाळांचे व्यक्तिचित्र रेखाटा.

**किंवा**

'प्रेमा, तुझा रंग कसा ?' या नाटकाचे वाङ्मयीन मूल्यामापन करा. 15

5. बच्चूचे स्वभावचित्रण करा.

**किंवा**